THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

FRIDAY, 1st AUGUST 1890.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट आलीजा गव्हर्नर साहेब बहादूर यांनीं तारीख १८ माहे जानेवारी सन १८९० रोजीं, आणि आलीजनाब व्हैसराय व गव्हर्नर जनरल यांनीं तारीख ४ माहे मार्च सन १८९० रोजीं मंजूर केला, तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं प्रसिद्ध केला असे:—

## सन १८८९ चा मुंबईचा आक्ट १ ला.

### सन १८८९ चा मुंबईचा गांव आरोग्यरक्षण आक्ट.

( हिंदुस्तानचे गव्हर्नर जनरल यांनीं या आक्टास दिलेली मंजुरी, मुंबईचे गव्हर्नरसाहेब बहादूर यांनीं तारीख २३ माहे मे सन १८९० रोजीं प्रथम प्रसिद्ध केली. )

अनुक्रमणिका.


| | कलम. | पोट-कलम. |
|---|---|---|
| **भाग १ ला.** | | |
| **प्रारंभींचे नियम.** | | |
| लहान सरनामा ... ... ... | १ | ... |
| व्याप्ति ... ... ... ... | २ | ... |
| कायदे रद्द करणें ... ... ... | ३ | ... |
| व्याख्या ... ... ... ... | ४ | ... |
| "गांव." ... ... ... ... | " | (अ) |
| "फर्माविलेलें." ... ... ... | " | (ब) |
| "चावडी." ... ... ... | " | (क) |
| भाग २, ३ व ४ यांचा अमल. ... | ५ | ... |
| भाग २ हा कोणत्या रीतीनें गांवास लागू करणें ... ... ... | ६ | ... |
| **भाग १ ला—चालू.** | | |
| **प्रारंभींचे नियम—चालू.** | | |
| भाग ३ हा कोणत्या रीतीनें गांवास लागू करणें ... ... ... | ७ | ... |
| **भाग २ रा.** | | |
| **आरोग्यरक्षक कमिट्या.** | | |
| प्रत्येक गांवांत आरोग्यरक्षक कमिटी असणें. | ८ | ... |
| कमिटीनें चालविलेल्या कामांचा रोजनामा. | ९ | ... |
| गांवांत अधिकार असणाऱ्या माजिस्ट्रेटांस कमिटीनें चालविलेल्या कामांत सामील होण्याचा अधिकार आहे ... ... | १० | ... |

| | कलम. | पोट-कलम. |
|---|---|---|
| **भाग २ रा—चालू.** | | |
| **आरोग्यरक्षक कमिट्या—चालू.** | | |
| आरोग्यरक्षक कमिटीनें गांवच्या संबंधानें कानू करणें ... ... ... | ११ | ... |
| कानू करण्याच्या संबंधाचे ठराव ... | १२ | ... |
| कानूविरुद्ध अपराध करणारांवर फौजदारी काम चालविणें... ... ... | १३ | ... |
| कानूंविरुद्ध झालेल्या अपराधांची चौकशी करण्याचा कमिटीस अधिकार. ... | १४ | ... |
| कमिट्यांच्या निकालांवर अपिलें ... | १५ | ... |
| आरोग्यरक्षक कमिटी जरूर असलेल्या कामांसाठीं किंवा तजविजींसाठीं लागणारा खर्च करण्याचा अधिकार देण्यास मुखत्यार आहे.... ... ... | १६ | ... |
| अशा कामासाठीं किंवा तजविजींसाठीं आपखुशीनें वर्गणी करून पैका उभारण्याचा अधिकार आहे. ... ... | १७ | ... |
| खर्चाकरितां जरूर असलेला पैका रहिवाशावर पट्टी बसवून उभारण्याचा अधिकार आहे. ... ... ... | १८ | ... |
| **भाग ३ रा.** | | |
| **आरोग्यरक्षक बोर्ड.** | | |
| आरोग्यरक्षक बोर्डाची रचना ... ... | १९ | ... |
| आरोग्यरक्षक बोर्डास कानू करण्याचा अधिकार आहे... ... ... | २० | ... |
| आरोग्यरक्षक इन्स्पेक्टर व इतर अमलदार यांची नेमणूक ... ... ... | २१ | ... |
| आरोग्यरक्षक इन्स्पेक्टराचीं कामें ... | २२ | ... |
| कानूचें उल्लंघन केल्याबदल बोर्डानें आपण होऊन फौजदारी काम चालविणें. ... | २३ | ... |
| कानूंविरुद्ध झालेल्या अपराधांची चौकशी करण्याचा बोर्डास अधिकार. ... | २४ | ... |
| आरोग्यरक्षक बोर्डाचे हुकूम कोणी अमलांत आणावे. ... ... ... | २५ | ... |
| आरोग्यरक्षक बोर्डास कित्येक करार करण्याचा अधिकार आहे ... ... | २६ | ... |

| | कलम. | पोट-कलम. |
|---|---|---|
| **भाग ३ रा—चालू.** | | |
| **आरोग्यरक्षक बोर्ड—चालू.** | | |
| कोणतीं कामें व इमारती बांधून देण्याचा आरोग्यरक्षक बोर्डास अखत्यार आहे... | २७ | ... |
| आरोग्यरक्षक बोर्डाचा खर्च भागविण्यासाठीं आपखुशीनें वर्गणी उभारण्याचा अधिकार आहे ... ... ... | २८ | ... |
| कोणत्या कारणासाठीं आरोग्यरक्षक बोर्डानें खर्च केला पाहिजे ... ... | २९ | .. |
| आरोग्यरक्षक बोर्डाची काम करण्याची रीति व साधनें. ... ... .. | ३० | ... |
| **भाग ४ था.** | | |
| **सामान्य ठराव.** | | |
| सरकारच्या कित्येक अमलदारांनीं आरोग्यरक्षक कमिट्यांना व बोर्डांना सल्ला देणें | ३१ | ... |
| आरोग्यरक्षक कमिट्या व बोर्ड यांचे मेंबर वगैरे यांस हुद्यावरून दूर करणें. ... | ३२ | ... |
| रिकाम्या झालेल्या जागा भरणें ... | ३३ | ... |
| बहुमतानें निकाल करण्याच्या बाबती ... | ३४ | ... |
| समन्सेंवगैरे यांवर सही करणें. ... | ३५ | ... |
| या आक्टाअन्वयें केलेल्या कानूंच्या उल्लंघनाबदल शिक्षा.... ... ... | ३६ | ... |
| दंड वसूल करण्याबदल हुकुम. ... | ३७ | ... |
| दंड व पट्ट्या वसूल करणें ... ... | ३८ | ... |
| दंडाचें नक्की उत्पन्न, अपराध जेथें झाले असतील त्या गांवांवर अधिकार असणाऱ्या कमिटीच्या अगर बोर्डाच्या हिशोबीं जमा करणें ... ... ... | ३९ | ... |
| लोकल बोर्डाकडून वर्गण्या व कर्जें. ... | ४० | ... |
| दोन किंवा अधिक आरोग्यरक्षक कमिट्या किंवा बोर्ड यांच्या सामायिक हितसंबंधाचीं काम करण्याबाबद.... ... | ४१ | (१) |
| सदरील कामांचा खर्च वसूल करणें. ... | ,, | (२) |
| आरोग्यरक्षक कमिटीनें अगर बोर्डानें योजलेलें काम लोकल बोर्डानें योजलेल्या कामास बाधक होत असल्यास, यांपैकीं पाहिलें बंद करणें. ... ... | ,, | (३) |

| | कलम. | पोट-कलम. | | कलम. | पोट-कलम. |
|---|---|---|---|---|---|
| **भाग ४ था—चालू.** | | | **भाग ४ था—चालू.** | | |
| **सामान्य ठराव—चालू.** | | | **सामान्य ठराव.—चालू.** | | |
| सदरील प्रसंगीं माहिती मागविण्याचा लोकल बोर्डांस अधिकार आहे ... | ४१ | (४) | कलेक्टर, माजिस्ट्रेट व इतर सरकारी नोंकर हे आपला अधिकार चालविण्याच्या संबंधानें नेहमीच्या निर्बंधास पात्र असतील ... ... ... | ४५ | ... |
| कांहीं गांव-नोकरांस आरोग्यरक्षक कमिटीच्या किंवा बोर्डांच्या ताब्यांत देणें. ... | ४२ | ... | या आक्टाअन्वयें इमानेइतबारें काम करणाऱ्या मनुष्यांस शिक्षेची माफी. | ४६ | ... |
| आरोग्यरक्षक कमिटी किंवा बोर्ड यांच्या ताब्यांत दिलेल्या गांव-नोकरांस द्यावयाचा ऐवज ठरविणें व तो वसूल करणें. ... | ४३ | ... | | | |
| या आक्टाखालील कलेक्टराचीं कामें सोंपून देतां येतील ... ... ... | ४४ | ... | **परिशिष्ट.** | | |

## सन १८८९ चा मुंबईचा आक्ट १ ला.

### सन १८८९ चा मुंबईचा गांव आरोग्यरक्षण आक्ट.

ज्याअर्थीं मुंबई इलाक्यांतील गांवांची आरोग्यरक्षणासंबंधी स्थिति सुधारण्याच्या कारणासाठीं सदरहू गांवांवर अधिकार असणाऱ्या अशा आरोग्यरक्षक कमिट्या व बोर्ड स्थापन करण्याबद्दल तजवीज करणें योग्य आहे, याअर्थीं खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे :

### भाग १ ला.

#### प्रारंभींचे नियम.

१. ह्या आक्टास "सन १८८९ चा मुंबईचा गांव आरोग्यरक्षण आक्ट" असें ह्मणावें. — लहान सरनामा.

२. तो मुंबई शहर, एडन व त्याच्या ताब्यांतील प्रांत, पेरिम आणि सन १८७४ चा शेड्युल्ड डिस्ट्रिक्ट आक्ट यांत सांगितलेले मेवासी ठाकुरांचे शेड्युल्ड डिस्ट्रिक्टांतील गांव हीं खेरीज करून, सगळ्या मुंबई इलाक्यास लागू आहे. — व्याप्ति.

३. कोणत्याही गांवांत भाग २ रा किंवा भाग ३ रा आणि त्यांअन्वयें केलेल्या कानू हीं अमलांत असतील तावत्कालपर्यंत, ह्या आक्टाच्या परिशिष्टांत दिलेल्या कायद्यांचा अमल, त्या परिशिष्टाच्या तिसऱ्या कोष्टकांत सांगितलें आहे तेथवर, सदरहू गांवांत अगदीं बंद राहील असें समजावें. — कायदे रद्द करणें.

४. ह्या आक्टांत, विषयावरून किंवा संदर्भावरून बाध येत नसेल तर: — व्याख्या.

(अ) "गांव" ह्मणजे, सन १८७९ चा मुंबईचा जमीनमहसुलाचा कायदा याच्या १२६ व्या कलमाअन्वयें वगैरे विवक्षित काळीं ठरविलेलें गांवाचें अगर कसब्याचें ठाण आणि अशा ठाणाच्या कोणत्याही भागापासून एक चतुर्थांश मैल अंतराच्या आंतील प्रदेश हीं, जितक्या अंशीं एकाद्या कायम मुनिसिपल डिस्ट्रिक्टांत अगर लष्करी कंटोन्मेंटांत धरलेलीं नसतील, तितक्या अंशीं तें ठाण व तो प्रदेश असें समजावें; — "गांव."

(ब) "फर्माविलेलें" ह्मणजे या आक्टाअन्वयें केलेल्या एकाद्या कानूवरून फर्माविलेलें असें समजावें; — "फर्माविलेलें."

(क) ज्या कोणत्याही गावांत चावडी नसेल त्या गांवांत "चावडी" ह्मणजे, जी जागा या आक्टाच्या कारणांसाठीं चावडी मानावी ह्मणून कलेक्टर फर्मावील ती जागा असें समजावें. — "चावडी."

भाग २, ३ व ४ यांचा अमल.

९. (१) भाग २ हा, कलेक्टरास या बाबतींत या आक्टांत पुढें दिलेल्या अधिकाराअन्वयें तो ज्या कोणत्याही गांवास लागू करील, त्या गांवांत तो भाग कलेक्टर ठरवील त्या तारखेपासून अमलांत येईल, आणि यांप्रमाणें लागू केला ह्मणजे तो, गव्हर्नर इन् कौन्सिल हे अशा गांवांत त्याचा अमल बंद होईल असें मुंबई सरकारी गझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून फर्मावितील किंवा अशा गांवास भाग ३ हा लागू करतील तों-पर्यंत अमलांत राहील.

(२) भाग ३ हा, गव्हर्नर इन् कौन्सिल यांस या बाबतींत या आक्टांत पुढें दिलेल्या अधिकाराअन्वयें ते ज्या कोणत्याही गांवास लागू करतील, त्या गांवांत तो भाग गव्हर्नर इन् कौन्सिल हे या बाबतींत ठरवितील त्या तारखेपासून अमलांत येईल, आणि याप्रमाणें लागू केला ह्मणजे तो, गव्हर्नर इन् कौन्सिल हे अशा गांवांत त्याचा अमल बंद होईल असें मुंबई सरकारी गझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून फर्मावितील तों-पर्यंत अमलांत राहील.

(३) भाग ४ यांतील ठराव लागू पडण्यासारखे असतील तितक्या अंशीं ते, भाग २ किंवा भाग ३ ज्या गांवांत अमलांत असेल तशा दरेक गांवांत व तशा गांवाच्या संबंधानें अमलांत असतील असें समजावें.

भाग २ हा कोणत्या रीतीनें गांवास लागू करणें.

१०. (१) कमिशनराच्या व सरकारच्या निर्बंधास पात्र राहून कलेक्टरास, भाग ३ हा अमलांत नाहीं अशा त्याच्या जिल्ह्यांतील कोणत्याही गांवास कोणत्याही वेळीं भाग २ हा लागू करण्याचा अखत्यार आहे.

(२) अशा कोणत्याही गांवास भाग २ रा लागू करण्याच्या कारणासाठीं कलेक्टरानें जिल्ह्याच्या देशभाषेंत एक जाहिरनामा, आपल्या स्वतःच्या कचेरींत व सदरहू गांव ज्या तालुक्यांत किंवा महालांत असेल त्या तालुक्याच्या मामलतदाराच्या किंवा त्या महालाच्या महालकऱ्याच्या कचेरींत व सदरहू गांवांतील चावडींत अगर इतर कोणत्यातरी सार्वजनिक इमारतींत प्रसिद्ध जागीं त्याच्या प्रती लावून प्रसिद्ध करविला पाहिजे आणि त्यांत, त्याच्या उलट कलेक्टराकडून पुढें दुसरा जाहिरनामा देण्यांत न आल्यास भाग २ हा, तो जाहिरनामा सदरहू गावांत लाविल्याच्या तारिखेपासून दोन महिन्यांच्या आंतील नसणारी अशी एकादी तारीख त्या जाहिरनाम्यांत नेमून, त्या तारखेस व त्या तारखेपासून त्या गांवास लागू होईल असें फर्मावलें पाहिजे, व तसेंच तो भाग लागू करण्याच्या संबंधानें त्या गांवचा कोणताही रहिवासी जी कोणतीही हरकत घेऊं इच्छील ती सदरहू नेमलेल्या तारखेपूर्वी निदान एक महिना अगोदर कलेक्टराकडेस गुजरली असतां ती दाखल करून घेऊन तिचा विचार होईल असेंही त्या जाहिरनाम्यांत नमूद केलें पाहिजे.

(३) वर सांगितल्याप्रमाणें ज्या हरकती दाखल झाल्या असतील त्यांचा विचार केल्यानंतर, सदहू गांवास भाग २ हा लागू न करण्यास किंवा त्यास तो लागलीच लागू न करण्यास एकादें चांगलें कारण आहे असें कलेक्टरास वाटल्यास तो, वर सांगितल्याप्रमाणें जाहिरनामा प्रसिद्ध करूनः

(अ) आपला पूर्वींचा जाहिरनामा रद्द करण्यास, किंवा

(ब) कांहीं निर्दिष्ट मुदतीपर्यंत सदरहू गांवास भाग २ रा लागू करण्याचें तहकूब ठेवण्यास,

मुखत्यार आहे.

(४) कांहीं निर्दिष्ट मुदतीपर्यंत त्या गांवास भाग २ रा लागू करण्याचें कलेक्टर तहकूब ठेवील तर तो त्यानंतर, वर सांगितल्याप्रमाणें जाहिरनामा प्रसिद्ध करूनः

(क) सदरहू भाग लागू करण्याचा बेत कोणत्याही वेळीं रहित करण्यास, किंवा

(ड) सदरहू भाग लागू करण्याचें वेळेविळीं आणखी कांहीं निर्दिष्ट मुदतीपर्यंत लांबणीवर घालण्यास,

मुखत्यार आहे.

७. (१) मुंबई इलाक्याच्या ज्या कोणत्याही भागास हा आक्ट लागू असेल त्या भागांतील कोणत्याही गांवास कोणत्याही वेळीं भाग ३ रा लागू करण्यास गव्हर्नर इन् कौन्सिल हे मुखत्यार आहेत, मग त्या वेळीं त्या गांवांत भाग २ हा अमलांत असो अगर नसो. भाग २ रा अमलांत असलेल्या गांवास यापमाणें भाग ३ रा लागू केला म्हणजे त्या गांवांत २ ऱ्या भागाचा अमल चालावयाचा बंद होतो असें समजावें. भाग ३ हा कोणत्या रीतीनें गांवास लागू करणें.

(२) अशा कोणत्याही गांवास भाग ३ रा लागू करण्याच्या कारणासाठीं गव्हर्नर इन् कौन्सिल यांनीं मुंबई सरकारी गॅझेटांत एक जाहिरनामा प्रसिद्ध केला पाहिजे आणि त्यांत, त्याच्या उलट गव्हर्नर साहेबांकडून पुढें दुसरा जाहिरनामा देण्यांत न आल्यास भाग ३ हा, त्या जाहिरनाम्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आंतील नसणारी अशी एकादी तारीख त्या जाहिरनाम्यांत नेमून, त्या तारखेस व त्या तारखेपासून, त्या गांवास लागू होईल असें फर्मावलें पाहिजे, व तसेंच तो भाग लागू करण्याच्या संबंधानें त्या गांवचा कोणताही रहिवासी जी कोणतीही हरकत घेऊं इच्छील ती सदरहू नेमलेल्या तारखेपूर्वीं निदान एक महिना अगोदर सरकारच्या एकाद्या सेक्रेटरीकडेस किंवा कलेक्टराकडेस गुजरली असतां ती दाखल करून घेऊन तिचा विचार होईल असेंही त्या जाहिरनाम्यांत नमूद केलें पाहिजे.

(३) वर सांगितल्याप्रमाणें कोणत्याही हरकती घेतल्या असतील त्यांचा विचार केल्यानंतर, सदहू गांवास भाग ३ रा लागू न करण्यास किंवा त्यास तो लागलीच लागू न करण्यास एकादें चांगलें कारण आहे असें सरकारास वाटल्यास, ६ व्या कलमाचीं पोट-कलमें (३) व (४) यांवरून २ ऱ्या भागाच्या संबंधानें जे अधिकार चालविण्याची कलेक्टरास परवानगी दिली आहे तसेच अधिकार सदरहू भाग लागू करण्याच्या संबंधानें मुंबई सरकारी गॅझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून चालविण्यास सरकार मुखत्यार आहे.

(४) या कलमाअन्वयें सरकारानें प्रसिद्ध केलेल्या प्रत्येक जाहिरनाम्याचा जिल्ह्याच्या देशभाषेंत तर्जुमा कलेक्टरानें विलंब न लावितां, स्वतः त्यानें काढलेला जाहिरनामा प्रसिद्ध करण्याबाबद ६व्या कलमाचें पोट-कलम (२) यांत सांगितलेल्या रीतीनें, प्रसिद्ध केला पाहिजे.

---

## भाग २ रा.

### आरोग्यरक्षक कमिट्या.

८. (१) हा भाग लागू केलेल्या प्रत्येक गांवांत एकेक आरोग्यरक्षक कमिटी असली पाहिजे. सदरहू कमिटींत तीन किंवा तिहोंहून अधिक जाणते घरंदाज इसम असले पाहिजेत. हे इसम गांवचे रहिवासी असून त्यांच्या स्वतःच्या संमतीनें कलेक्टरानें पसंत केलेले असावे, व त्यांपैकीं एक पोलीस पाटील असावा; परंतु कोणत्याही एकाद्या प्रसंगीं तो नसावा असें कलेक्टरास कांहीं कारणांवरून वाटल्यास त्यानें त्यास नेमूं नये, व अशीं कारणें असतील तीं लिहून ठेवावीं. सदरहूप्रमाणें पसंत करण्याच्या प्रत्येक गांवांत आरोग्यरक्षक कमिटी असणें.

कामीं आपणास मदत व्हावी ह्मणून कलेक्टरानें आपणास योग्य वाटेल त्या रीतीनें गांवांतील घरंदाज इसमांकडून, आपल्या नजरेस येईल त्याप्रमाणें, लायक मनुष्यांचीं नांवें सांगून घ्यावीं अगर त्यांची निवड करावी.

(२) सदरहू कामिटीचा चेअरमन कलेक्टरानें नेमला पाहिजे.

(३) कमिटीचा चेअरमन व इतर मेंबर फर्माविलेल्या मुदतीपर्यंत आपापल्या हुद्द्यांवर राहतील.

कमिटीनें चालविलेल्या कामांचा रोजनामा.

९. आरोग्यरक्षक कमिटीनें चालविलेल्या कामांचा रोजनामा गांवचा कुळकरणी किंवा तलाठी यानें अगर त्या कामासाठीं कलेक्टर नेमील त्या दुसऱ्या मनुष्यानें, व गांवचा कुळकरणी किंवा तलाठी अगर सदरहूप्रमाणें नेमलेला मनुष्य गैरहजर असेल त्या वेळीं, त्या कारणासाठीं कमिटी ज्या इतर मनुष्याची योजना करील त्या मनुष्यानें, फर्माविलेल्या रीतीनें (किंवा ११ व्या कलमाअन्वयें कानू करण्यांत येत तोंपर्यंत, कलेक्टर लेखी हुकुम करून फर्मावील त्या रीतीनें) ठेविला पाहिजे; आणि सदरहू रोजनाम्याच्या खरेपणासाठीं चेअरमनानें अगर त्या बाबतींत कमिटीनें अधिकार दिलेल्या कमिटीच्या दुसऱ्या कोणातरी मेंबरानें प्रत्येक दिवशीं चालविलेल्या कामांच्या शेवटीं सही केली पाहिजे.

गांवांत अधिकार असणाऱ्या माजिस्ट्रेटांस कमिटीनें चालविलेल्या कामांत सामील होण्याचा अधिकार आहे.

१०. विवक्षित गांवांत अधिकार असणारा प्रत्येक माजिस्ट्रेट, कमिटीच्या ज्या कोणत्याही सभेंत तो हजर असेल त्या सभेंत कमिटीनें चालविलेल्या कामांत सामील होण्यास मुखत्यार आहे, आणि याप्रमाणें सामील होण्याच्या कारणासाठीं अशा माजिस्ट्रेटास, किंवा असे एकाहून अधिक माजिस्ट्रेट असल्यास, त्यांपैकीं वरिष्ठ दर्जाच्या माजिस्ट्रेटास त्या प्रसंगापुरता कमिटीचा मेंबर व अध्यक्ष मानला पाहिजे.

आरोग्यरक्षक कमिटीनें गांवच्या संबंधानें कानू करणें.

११. आरोग्यरक्षक कमिटीस, खालीं लिहिलेल्या गोष्टींबाबद, ह्मणजे:

(अ) आपल्या मेंबरांनीं हुद्द्यावर राहण्याच्या मुदतीविषयीं ठराव, व आपण चालविलेल्या कामाचें नियमन, हीं करण्याबाबद,

(ब) आपण चालविलेल्या कामांचा कोणत्या रीतीनें रोजनामा ठेवावा हें ठरविण्याबाबद,

(क) गांवच्या उपयोगासाठीं प्यावयाच्या स्वच्छ पाण्याचा पुरेसा पुरवठा करणें व तो राखणें यांबाबद,

(ड) गांवांतील रस्ते व खुल्या जागा यांची साफसफाई करण्याबाबद,

(इ) गांवांत दुर्गंधी व अपकारक पदार्थ सांचूं न देण्याबाबद,

(फ) गांवांत घाण व बीभत्स असणारीं किंवा आरोग्यरक्षणास बाध आणणारीं अशीं कृत्यें किंवा वर्जनें होऊं न देण्याबाबद, आणि

(ग) सामान्यतः या आक्टाचे हेतु गांवांत अमलांत आणण्याबाबद,

कलेक्टराच्या मंजुरीनें, वेळोवेळीं कानू करण्याचा व त्या रद्द करण्याचा अगर त्यांत फेरफार करण्याचा अखत्यार आहे.

कानू करण्याच्या संबंधानें ठराव.

१२. (१) ११ व्या कलमाअन्वयें जी कोणतीही कानू करावयाचें योजलें असेल ती अमलांत येण्याच्या पूर्वीं, निदान तीन महिने पर्यंत, तिची एक प्रत गांवांतील चावडींत किंवा दुसऱ्या कोणत्यातरी सार्वजनिक इमारतींत कमिटीनें लावून ठेविली पाहिजे, आणि ती कानू अमलांत येण्याच्या तारखेपूर्वीं—ही तारीख निर्दिष्ट केली पाहिजे—निदान एक महिना अगोदर तिच्या संबंधानें हरकती कलेक्टराकडे लेखीं गुजरल्या असतां, त्या दाखल करून घेतल्या जाऊन त्यांचा विचार करण्यांत येईल अशी एक नोटीस सदरहू कानूच्या प्रतीस जोडली पाहिजे.

(२) ज्या कोणत्याही हरकती सदरहूप्रमाणें गुजरण्यांत येतील त्यांचा कलेक्टरानें कमिटींत बसून विचार केला पाहिजे. जर याप्रमाणें विचार केल्यावर, योजलेल्या कानूंत फेरफार करणें किंवा ती रद्द करणें इष्ट आहे असें दिसून येईल, तर त्याप्रमाणें फेरफार करणें किंवा रद्द करणें तें वर सांगितल्याप्रमाणें नोटीस लावून अमलांत आणिलें पाहिजे. एकाद्या कानूचा अमल तहकूब करणें योग्य आहे असें कलेक्टरास वाटल्यास, वर सांगितल्याप्रमाणें नोटीस लावून तिचा अमल कांहीं निर्दिष्ट मुदतीपर्यंत तहकूब करण्याचा अधिकार आहे. या नोटिशींत, सदरहू मुदत संपण्यापूर्वी निदान एक महिना अगोदर सदरहू कानूच्या संबंधाच्या हरकती वर सांगितल्याप्रमाणें गुजरल्या असतां त्या दाखल करून घेतल्या जाऊन त्यांचा विचार करण्यांत येईल असें लिहिलें पाहिजे. याप्रमाणें जी कोणतीही हरकत गुजरली असेल तिचा वर सांगितल्याप्रमाणें विचार केला पाहिजे, आणि मग त्या कानूंत फेरफार करणें किंवा ती रद्द करणें इष्ट आहे असें वाटल्यास, त्याप्रमाणें वर सांगितलेल्या रीतीनें जाहीर केलें पाहिजे.

(३) पोट-कलम (२) यांतील ठराव लागू राहून कमिटीनें, कलेक्टराची मंजुरी घेऊन, केलेली व वर सांगितल्याप्रमाणें जाहीर केलेली प्रत्येक कानू, जाहीर केलेल्या तारिखेस अमलांत येईल असें समजावें.

१३. ११ व्या कलमाअन्वयें कमिटीनें केलेल्या कोणत्याही कानूचें उल्लंघन गांवांतील कोणत्याही मनुष्यानें उघडपणें केलें आहे किंवा तिचें उल्लंघन केल्याचा त्याजवर आरोप आहे असें आरोग्यरक्षक कमिटीच्या नजरेस येईल किंवा तिला समजण्यांत येईल, तेव्हां अशा मनुष्यास लेखी नोटीस देऊन कमिटीपुढें हजर होण्याविषयीं फर्माविण्याचा सदरहू कमिटीस अधिकार आहे. कानूंविरुद्ध अपराध करणारांवर फौजदारी काम चालविणें.

१४. (१) ११ व्या कलमाअन्वयें कमिटीनें केलेल्या कानूंविरुद्ध होणाऱ्या सर्व अपराधांची चौकशी करण्याचा कमिटीस अधिकार आहे. कानूंविरुद्ध झालेल्या अपराधांची चौकशी करण्याचा कमिटीस अधिकार

(२) हा अधिकार चालविण्याच्या कारणासाठीं कमिटी, गांवांतील चावडींत किंवा गांवांतील अगर गांवांजवळील कोणत्या तरी इतर सोईवार जागेंत, जरूर पडेल तितक्या वेळां किंवा डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेट फर्मावील तितक्या वेळां, भरली पाहिजे.

(३) कमिटीनें आरोपी मनुष्यासमक्ष, किंवा वर सांगितल्याप्रमाणें सदरहू मनुष्यावर नोटीस बजाविली असतांही तो हजर न झाल्यास त्याच्या परोक्ष, जो अपराध घडून आला असें ह्मणणें असेल त्याबाबदचा पुरावा व सदरहू मनुष्यानें आपल्या तर्फे कोणताही पुरावा हजर केला असल्यास तो, घेतला पाहिजे, व त्यानंतर तिनें आरोपी मनुष्यावर अपराधाची नाशाबिती किंवा शाबिती झाल्याबद्दल ठराव केला पाहिजे, आणि त्याजवर अपराधाची शाबिती झाल्यास, या आक्टांत किंवा सदरील कानूंत ठरविलेली जी शिक्षा कमिटीस वाजवी वाटेल ती शिक्षा त्याला देण्याचा त्या कमिटीस अधिकार आहे.

१५. (१) ज्या मनुष्यावर अपराधाची शाबिती झाल्याबद्दल कमिटीनें ठराव केला असेल त्याला, शिक्षा दिल्यानंतर दहा दिवसांचे आंत कोणत्याही वेळीं, डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेटाकडे किंवा शिक्षा झालेल्या जागीं क्रिमिनल प्रोसीजर कोडाअन्वयें अपिलें घेण्याचा अधिकार असणाऱ्या इतर माजिस्ट्रेटाकडे, किंवा अशा कमिटीचा मेंबर नसणारा जो इतर कोणताही माजिस्ट्रेट डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेटानें, सरकारांतून वेळोवेळीं होणारे हुकुम लागू राहून, याबाबतींत नेमिला असेल त्याकडे अपील करण्याचा अधिकार आहे. कमिट्यांच्या निकालांवर अपिलें.

(२) अशा मनुष्यानें अपील करण्याचा आपला इरादा असल्याची नोटीस देऊन त्यास झालेल्या दंडाची रकम या बाबतींत डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेटानें नेमिलेल्या

अमलदारापाशीं अमानत ठेविल्यास, शिक्षा झाल्याच्या तारिखेपासून दहा दिवस संपत तोंपर्यंत, अगर अपील केल्यास अपिलाचा निकाल होईपर्यंत, झालेली शिक्षा अमलांत आणण्याचें तहकूब केलें पाहिजे. दहा दिवसांच्या आंत अपील न केल्यास, अमानत ठेवलेली रकम झालेल्या दंडबदल घेण्यांत येईल.

(३) अपिलाची चौकशी करणारा माजिस्ट्रेट आरोग्यरक्षक कमिटीचा निकाल कायम करण्यास, रद्द करण्यास किंवा त्यांत कंपेश करण्यास, आणि कमिटीस देतां आली असती अशा शिक्षेचा कोणताही हुकुम करण्यास मुखत्यार आहे. याप्रमाणें त्यानें केलेला हुकुम, आरोग्यरक्षक कमिटीनें केलेल्या हुकुमाप्रमाणेंच अमलांत आणला पाहिजे.

(४) जेव्हां सदरहू माजिस्ट्रेटास अपिलाचा निकाल होई तोंपर्यंत, झालेली शिक्षा अमलांत आणण्याचें तहकूब ठेवणें जरूर किंवा योग्य दिसेल, तेव्हां त्याला वाजवी दिसतील तशा शर्तींवर त्याप्रमाणें तहकूब ठेवण्याचा त्यास अधिकार आहे.

आरोग्यरक्षक कमिटी जरूर असलेल्या कामांसाठीं किंवा तजविजींसाठीं लागणारा खर्च करण्याचा अधिकार देण्यास मुखत्यार आहे.

१६. गांवासाठीं प्यावयाच्या स्वच्छ पाण्याचा पुरेसा पुरवठा करण्याच्या, गांवांतील रस्ते व खुल्या जागा ह्यांची साफसफाई करण्याच्या, व त्यांतील दुर्गंधी व अपकारक पदार्थ काढून नेण्याच्या कारणांसाठीं, आणि गांवच्या रहिवाशांच्या आरोग्यास व सुखास हितावह असणाऱ्या अशा इतर कारणांसाठीं आरोग्यरक्षक कमिटीस, गांवच्या रहिवाशांनीं आपखुशीनें केलेल्या मेहनतीचा आणि ४२ व्या कलमाअन्वयें तिच्या ताब्यांत दिलेल्या गांव-नौकरांच्या नोकरीचा साधेल तेथवर उपयोग करून घेण्याचा अधिकार आहे, आणि जेव्हां हीं साधनें पुरत नाहींत असें होईल तेव्हां ती कमिटी, वेळोवेळीं, कलेक्टराच्या मंजुरीनें, वर सांगितलेल्या कारणासाठीं जरूर व वाजवी असतील तसे नोकर कामास लावण्यास, तसे करार करण्यास, आपल्या अधिकाराअन्वयें घ्यावयाच्या कोणत्याही पट्टींतून तशा रकमा वजा करण्यास व सूट देण्यास आणि तशा पैक्याच्या रकमांचा कलेक्टराकडून किंवा त्याच्या निबंधाखालीं खर्च करविण्यास मुखत्यार आहे.

अशा कामांसाठीं किंवा तजविजींसाठीं आपखुशीनें वर्गणी करून पैका उभारण्याचा अधिकार आहे.

१७. गांवचे रहिवासी आपखुशीनें वर्गणी करून, वर सांगितलेल्या कोणत्याही कारणासाठीं पैक्याची कोणतीही रकम उभारण्यास मुखत्यार आहेत. ही रकम मामलतदाराकडे किंवा त्या बाबतींत कलेक्टर नेमील त्या इतर अमलदाराकडे भरावी, आणि त्यानें ती आरोग्यरक्षक कमिटीच्या नांवीं एक हिशोब ठेवून त्यांत, सदरहू वर्गणी ज्या कारणासाठीं उभारली असेल त्यासाठीं या आक्टाअन्वयें झालेल्या खर्चाची फेड करण्याकरितां ह्मणून जमा करावी.

खर्चाकरितां जरूर असलेला पैका रहिवाशांवर पट्टी बसवून उभारण्याचा अधिकार आहे.

१८. (१) पैक्याच्या ज्या कोणत्याही रकमेचा खर्च करण्याचा कमिटीनें अधिकार दिला असेल ती रकम आपखुशीनें वर्गणी करून उभारण्यांत येत नाहीं व ती मिळण्यास दुसरा कोणताहि मार्ग नाहीं असें असेल तर ती गांवच्या रहिवाशांवर पट्टी बसवून वसूल करण्याचा अधिकार आहे. अशा पट्टीची आकारणी आरोग्यरक्षक कमिटीचा विचार घेऊन कलेक्टरानें करावी.

(२) मात्र असें ठरविण्यांत येतें कीं कोणत्याही गांवच्या रहिवाशांवर कोणत्याही सालांत जी एकंदर रकम सदरहूप्रमाणें बसवावयाची ती, त्या गांवच्या रहिवाशांकडून त्या सालांत लोकल फंड पट्टीबदल जी एकंदर रकम घ्यावयाची त्या रकमेच्या निमेहून अधिक असूं नये.

(३) या आक्टांत पुढें सांगितलेल्या ठरावांअन्वयें आरोग्यरक्षक कमिटीच्या खातीं जमा असून त्याचा उपयोग करण्यांत न आल्यामुळें शिलक राहिली असेल त्या पैक्यांतून, सन १८८४ चा मुंबईचा आक्ट १ला याच्या ३० व्या कलमाच्या रकमा (क), (ई) व (फ) यांवरून लोकल बोर्डाकडे सोंपलेलीं कामें करण्याच्या ठरावांस

अनुसरून त्या बोर्डाकडून जें कोणतेंही काम करण्यांत येत असेल त्या कामाच्या खर्चासाठीं आपणास योग्य वाटेल तेवढी रकम योग्य वाटतील तशा शर्तींवर देण्यास आरोग्यरक्षक कमिटी मुखत्यार आहे.

---

## भाग ३ रा.

### आरोग्यरक्षक बोर्ड.

आरोग्यरक्षक बोर्डाची रचना.

१९. (१) सरकार फर्मावील त्याप्रमाणें, हा भाग लागू केलेल्या प्रत्येक गांवांत एकेक आरोग्यरक्षक बोर्ड असला पाहिजे, किंवा असे दोन अगर अधिक गांव मिळून अशा प्रकारचा एक बोर्ड असला पाहिजे. अशा प्रत्येक बोर्डांत सरकार फर्मावील तितके कलेक्टरानें नेमलेले मनुष्य असले पाहिजेत. हे मनुष्य बोर्डाच्या अधिकाराखालीं असावयाच्या प्रदेशाच्या आंतील किंवा नजीकचे रहिवासी असून त्यांत त्यांची मिळकत असावी, व त्यांमध्यें साधारणतः पोलीस पाटलांचाही समावेश व्हावा. हे मनुष्य पसंत करण्याच्या कामीं आपणास मदत व्हावी ह्मणून कलेक्टरानें आपणास योग्य वाटेल त्या रीतीनें व योग्य वाटेल तशी ठिकठिकाणची संख्या ठरवून आपल्या नजरेस येईल त्याप्रमाणें लायक मनुष्यांचीं नांवें सांगून घ्यावीं अगर त्यांची निवड करवावी, आणि त्यांच्यांतून त्यानें सगळे किंवा कांहीं मेंबर पसंत करावे.

(२) अशा बोर्डाच्या प्रत्येक सभेंत, मेंबर असणारा जो सर्वांत मोठ्या दर्जाचा माजिस्ट्रेट हजर असेल त्यानें, किंवा असा कोणताही माजिस्ट्रेट नसल्यास, ज्याला कलेक्टर, सरकारचे हुकुम लागू राहून, बोर्डाचा अध्यक्ष नेमील त्या मेंबरानें अध्यक्षस्थानीं बसलें पाहिजे. कोणताही माजिस्ट्रेट व अध्यक्ष हे दोघेही नसले तर, हजर असलेल्या मेंबरांतून त्या प्रसंगापुरता जो चेअरमन सभेकडून पसंत करण्यांत येईल तो सभेचा अध्यक्ष होईल असें समजावें.

(३) बोर्डाचा अध्यक्ष व त्याचे मेंबर हे फर्माविलेल्या मुदतीपर्यंत आपापल्या हुद्द्यांवर राहतील असें समजावें.

आरोग्यरक्षक बोर्डास कानू करण्याचा अधिकार आहे.

२०. आरोग्यरक्षक बोर्ड वेळोवेळीं आपल्या अधिकाराखालील प्रदेशासाठीं, या आक्टांत मागें आरोग्यरक्षक कमिटींच्या बाबतींत सांगितल्या आहेत तशाच गोष्टींच्या संबंधानें, तशाच रीतीनें आणि तशाच ठरावांस, अटींस व शर्तींस अनुसरून, कलेक्टराच्या मंजुरीनें कानू करण्यास मुखत्यार आहे, आणि त्या बोर्डानें, या आक्टांत पुढें ठरविलें आहे त्या प्रसंगीं खेरीज करून, सदरहू प्रदेशांसाठीं सदरहू गोष्टींच्या संबंधानें, सदरील रीतीनें आणि सदरील ठरावांस, अटींस व शर्तींस अनुसरून कामें केलीं पाहिजेत व अधिकार चालविला पाहिजे.

आरोग्यरक्षक इन्स्पेक्टर व इतर अमलदार यांची नेमणूक.

२१. (१) कलेक्टर, सरकारचे हुकुम लागू राहून, वेळोवेळीं आरोग्यरक्षक बोर्डाच्या अधिकाराखालील कोणत्याही प्रदेशाकरितां किंवा त्या प्रदेशाच्या कोणत्याही भागाकरितां एक आरोग्यरक्षक इन्स्पेक्टर व तसेच जरूर वाटतील ते इतर ताब्यांतील कामगार नेमण्यास आणि अशा प्रत्येक अमलदारास द्यावयाचा पगार ठरविण्यास मुखत्यार आहे. तसेंच त्याला सदरहू अमलदारांस सस्पेंड करण्याचा किंवा काढून टाकण्याचाही अख्त्यार आहे.

(२) असा आरोग्यरक्षक इन्स्पेक्टर, त्या जागीं अधिकार असणाऱ्या तालुका किंवा डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डानें नोकरीस ठेविलेला मनुष्य असला तरी हरकत नाहीं. त्याला दोन किंवा अधिक आरोग्यरक्षक बोर्डांनीं किंवा त्यांच्या वतीनें नोकरीस ठेविला तरी चालेल.

आरोग्यरक्षक इन्स्पेक्टराचीं कामें.

२२. (१) आरोग्यरक्षक इन्स्पेक्टरानें, ज्या प्रदेशाकरितां त्याला नेमिला असेल त्या प्रदेशांत अमलांत असलेल्या कानूंचें उल्लंघन न होण्याबद्दल पुढीलप्रमाणें तजवीज ठेविली पाहिजे, ह्मणजे त्याबद्दल त्यानें वेळोवेळीं—

(अ) सदरहू कानू पाळण्याचे संबंधानें एक साधारण ताकीद [प्रसिद्ध जागीं] लावली पाहिजे व इतर रीतीनें प्रसिद्ध केली पाहिजे; किंवा

(ब) जो कोणताही मनुष्य सदरहू कानूंपैकीं कोणत्याही कानूविरुद्ध अपराध करतांना त्याला आढळेल त्याला ताकीद दिली पाहिजे; किंवा

(क) सदरहू कानूंपैकीं कोणत्याही कानूविरुद्ध अपराध केल्याबद्दल ज्या कोणत्याही मनुष्यावर फौजदारी काम चालवावें असें वाटण्यास, त्याच्या स्वतःच्या नजरेस आल्यावरून किंवा त्याच्या ताब्यांतील कामगारांनीं त्याला रिपोर्ट केल्यावरून, त्यास कारण असेल त्या मनुष्याला आरोग्यरक्षक बोर्डापुढें हजर होण्याविषयीं समन केलें पाहिजे.

(२) आरोग्यरक्षक इन्स्पेक्टरानें सरकार फर्मावील तशा प्रकारचे, या आक्टावरून त्याकडे सोंपलेल्या किंवा लोकल अगर आरोग्यरक्षक बोर्डाचा नोकर या नात्यानें निष्पन्न होणाऱ्या कामांस व जबाबदाऱ्यांस अनुसरून, सानिटरी कमिशनरास रिपोर्ट केले पाहिजेत, आणि तसेंच सरकार फर्मावील त्याप्रमाणें, सदरील कामांस व जबाबदाऱ्यांस अनुसरून, त्या कमिशनरापाशीं संबंध ठेविला पाहिजे.

कानूंचें उल्लंघन केल्याबद्दल बोर्डानें आपण होऊन फौजदारी काम चालविणें.

२३. तसेंच, २० व्या कलमाअन्वयें आरोग्यरक्षक बोर्डानें केलेल्या कोणत्याही कानूचें उल्लंघन केल्याचा आरोप आलेल्या कोणत्याही मनुष्याला, अगर ज्या कोणत्याही मनुष्यानें सदरहू उल्लंघन उघडपणें केल्याचें बोर्डास समजेल त्या मनुष्याला लेखी नोटीस देऊन बोर्डापुढें हजर होण्याविषयीं फर्माविण्याचा अशा बोर्डासही अधिकार आहे.

कानूंविरुद्ध झालेल्या अपराधांची चौकशी करण्याचा बोर्डास अधिकार.

२४. (१) २० व्या कलमाअन्वयें बोर्डानें केलेल्या कानूंविरुद्ध झालेल्या सर्व अपराधांची चौकशी करण्याचा बोर्डास अधिकार आहे, आणि हा अधिकार चालविण्याचे कारणासाठीं, बोर्डाच्या अधिकाराखालील प्रदेशांतील किंवा प्रदेशाजवळील कोणत्या तरी सोईवार जागेंत, जरूर पडेल तितक्या वेळां अगर डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेट फर्मावील तितक्या वेळां बोर्डाची सभा भरली पाहिजे.

(२) कलम १४, पोट-कलम (३) व कलम १९ यांतील ठराव, आरोग्यरक्षक बोर्डाकडून या कलमाखालीं येणाऱ्या खटल्यांची चौकशी व निकाल व्हावयाचा त्यांस, आणि ज्या मनुष्यांवर अपराधाची शाबिती झाल्याबद्दल अशा बोर्डानें ठराव केला असेल त्यांनीं करावयाच्या अपिलांस, शक्य असेल तेथवर, लागू होतील असें समजावें.

आरोग्यरक्षक बोर्डाचे हुकूम कोणीं अमलांत आणावे.

२५. (१) कलेक्टर वेळोवेळीं नेमील त्या प्रत्येक आरोग्यरक्षक बोर्डाच्या मेंबरानें, किंवा त्या बोर्डाच्या अमलदारानें, किंवा इतर अमलदारानें त्या बोर्डाचे हुकूम अमलांत आणले पाहिजेत आणि बोर्डाचे हुकूम व त्यानें चालविलेल्या कामांचा रोजनामा हे कागद फर्माविलेल्या रीतीनें तयार करून ठेवले पाहिजेत.

(२) ज्या मनुष्यास त्याबद्दल अधिकार मिळाला असेल त्यानें, बोर्डानें चालविलेल्या कामांचा व त्याच्या हुकुमांचा वास्तविक दाखला आपल्या सहीनिशीं ठेविला पाहिजे, आणि या आक्टावरहुकुम किंवा १० व्या कलमाअन्वयें केलेल्या कानूंवरहुकुम बोर्डानें किंवा त्याच्या कोणत्याही मेंबरानें फर्माविल्यावरून काढावयाचीं सर्व समन्सें, नोटिसा व हुकुम हीं वास्तविक रीतीनें तयार केलीं पाहिजेत.

२६. आरोग्यरक्षक बोर्ड कलेक्टराचे मंजुरीनें— आरोग्यरक्षक बोर्डास कित्येक करार करण्याचा अधिकार आहे.

(अ) आपल्या अधिकाराखालच्या प्रदेशांतील किंवा त्या प्रदेशाच्या कोणत्याही भागांतील रस्त्यांचा व सार्वजनिक जागांचा जेवढा पृष्ठभाग, ४२ व्या कलमाअन्वयें ताब्यांत दिलेले कांहीं गांवनोकर असल्यास त्यांच्यानें साफ होऊं शकत नसेल तेवढा प्रत्यहीं साफ करण्याबाबद, किंवा

(ब) सदरहू प्रदेशांतून कचरा, धुरळा, राख, गाळ, केर, मेलेल्या जनावरांचीं प्रेतें आणि कोणताही दुर्गंधी किंवा अपकारक पदार्थ काढून नेण्याबाबद,

कोणत्याही मनुष्याशीं करार करण्यास मुखत्यार आहे.

२७. प्रत्येक आरोग्यरक्षक बोर्ड, आपल्या अधिकाराखालील प्रदेशाकरितां किंवा त्याच्या कोणत्याही भागाकरितां— कोणतीं कामें व इमारती बांधून देण्याचा आरोग्यरक्षक बोर्डास अखत्यार आहे.

(अ) पाण्याचा पुरेसा पुरवठा,

(ब) कचरा, धुरळा, राख, गाळ, केर, मेलेल्या जनावरांचीं प्रेतें व इतर दुर्गंधी किंवा अपकारक पदार्थ कांहीं काळपर्यंत ठेवण्याकरितां किंवा त्यांची अखेर व्यवस्था करण्याकरितां योग्य व सोईवार जागा,

(क) रकम (ब) यांत निर्दिष्ट केलेले निरनिराळे पदार्थ व वस्तु काढून अगर वाहून नेण्याचीं साधनें,

या गोष्टींची तजवीज करण्यासाठीं जरूर असतील तीं कामें व इमारती कलेक्टराच्या मंजुरीनें बांधण्यास मुखत्यार आहे.

२८. आरोग्यरक्षक बोर्डाच्या अधिकारांतल्या प्रदेशांतील किंवा त्या प्रदेशाच्या कोणत्याही भागांतील रहिवासी आपखुशीनें वर्गणी करून, बोर्डास खर्च करण्यास अधिकार असेल अशा कोणत्याही कारणासाठीं पैक्याची कोणतीही रकम उभारण्यास मुखत्यार आहेत. ही रकम मामलतदाराकडे किंवा ३० व्या कलमाअन्वयें कलेक्टर नेमील त्या इतर अमलदाराकडे भरावी, आणि त्यानें ती ज्या प्रदेशांत व ज्या कारणासाठीं वर्गणी उभारली असेल त्या प्रदेशांत व त्या कारणासाठीं खर्च करण्याकरितां ह्मणून बोर्डाच्या खातीं जमा केली पाहिजे. आरोग्यरक्षक बोर्डाचा खर्च भागविण्यासाठीं आपखुशीनें वर्गणी उभारण्याचा अधिकार आहे.

२९. प्रत्येक आरोग्यरक्षक बोर्डास, खालीं लिहिलेल्या गोष्टींसाठीं लागणाऱ्या खर्चाची तजवीज करणें किंवा तसा खर्च करण्याची परवानगी देणें भाग आहे. सदरहू गोष्टी वितपशील:— कोणत्या कारणांसाठीं आरोग्यरक्षक बोर्डानें खर्च केला पाहिजे.

(अ) २१ व्या कलमाअन्वयें आरोग्यरक्षक इन्स्पेक्टर व इतर अमलदार नेमिले असल्यास त्यांचा पगार देणें;

(ब) बोर्डाच्या आणि सदरहू आरोग्यरक्षक इन्स्पेक्टर व इतर अमलदार असल्यास त्यांच्या उपयोगाकरितां कागदवगैरे लिहिण्याचें सामान व इतर जरूरीच्या वस्तु पुरविणें;

(क) २६ व्या कलमाअन्वयें बोर्डानें केलेला कोणताही करार पुरा करणें; आणि

(ड) २७ व्या कलमाअन्वयें जरूर असलेलीं कामें व इमारती बांधणें.

आरोग्यरक्षक बोर्डाची काम करण्याची रीति व साधनें.

३०. (१) मामलतदारानें किंवा त्या कामाकरितां कलेक्टरानें नेमलेला इतर अमलदार यानें प्रत्येक आरोग्यरक्षक बोर्डाच्या नांवें एक जमाखर्चाचा हिशोब ठेविला पाहिजे. अशा हिशोबाच्या खर्चाच्या बाजूस, २९व्या कलमाअन्वयें अधिकार असल्याप्रमाणें करण्यांत आलेला सर्व खर्च लिहिला पाहिजे. जमेच्या बाजूस, २८ व्या कलमाअन्वयें आपखुशीनें वर्गणी करून उभारलेल्या सर्व रकमा, बोर्डाचा खर्च भागविण्यासाठीं कोणत्याही इतर मार्गानें वसूल झालेल्या सर्व रकमा, आणि या आक्टांत पुढें ठरविल्याप्रमाणें कोणतीही पट्टी बसवून झालेलें नक्की उत्पन्न हीं लिहावीं.

(२) या आक्टाअन्वयें आरोग्यरक्षक बोर्डानें करावयाच्या खर्चाकरितां पैका उभारण्याच्या कारणासाठीं कलेक्टर वेळोवेळीं अशा बोर्डाचा विचार घेऊन, बोर्डाच्या अधिकाराखालच्या प्रदेशांतील किंवा त्या प्रदेशाच्या कोणत्याही भागांतील रहिवाशांवर, कलम १८ (१) याअन्वयें बसवावयाच्या पट्ट्यांच्या संबंधानें कलम १८ (२) यांत जी इयत्ता ठरविली आहे त्याच इयत्तेस अनुसरून, पट्टी आकारून बसविण्यास मुखत्यार आहे.

(३) पोट-कलम (२) याअन्वयें बसविलेल्या कोणत्याही पट्टीचा बोजा, बोर्डाच्या अधिकाराखालील प्रदेशाच्या निरनिराळ्या भागांवर, बोर्डाचा विचार घेऊन कलेक्टर फर्मावील त्या मानानें घालण्यांत येईल, अगर, बोर्डाच्या विचारानें कलेक्टर त्याप्रमाणें ठरवील तर, तो सर्वांशीं अशा एका किंवा अधिक भागांवर घालण्यांत येईल.

---

## भाग ४ था.

### सामान्य ठराव.

सरकारच्या कित्येक अमलदारांनीं आरोग्यरक्षक कमिट्यांना व बोर्डांना सल्ला देणें.

३१. एकाद्या आरोग्यरक्षक कमिटीच्या किंवा बोर्डाच्या संबंधानें जिल्ह्याचा एक्झिक्यूटिव्ह एन्जिनीयर यास, आणि एक्झिक्यूटिव्ह एन्जिनीयराच्या, सानिटरी कमिशनराच्या, किंवा लोकल बोर्डाच्या ताब्यांतील ज्या कोणत्याही अमलदाराला त्या जागीं अधिकार असून या बाबतींत साधारणपणें किंवा विशेष रीतीनें कलेक्टर नेमील त्या अमलदारास, सन १८८४ चा मुंबईचा आक्ट १ ला याच्या ३३ व्या कलमाच्या पहिल्या पारिग्राफावरून लोकल बोर्डांच्या संबंधानें कित्येक अमलदारांना जे हक्क दिले आहेत व त्यांकडे जीं कामें सोंपून दिलीं आहेत, तसेच हक्क असतील व त्यांकडे तशींच कामें असतील असें समजावें.

आरोग्यरक्षक कमिट्या व बोर्ड यांचे मेंबरवगैरे यांस हुद्यावरून दूर करणें.

३२. कलेक्टर, आरोग्यरक्षक कमिटीचा कोणताही मेंबर किंवा चेअरमन यास, आणि सरकारच्या मंजुरीनें आरोग्यरक्षक बोर्डाचा कोणताही मेंबर किंवा अध्यक्ष यास, तो नालायक दिसल्यास अगर नेणें करून त्याला हुद्यावरून दूर करणें वाजवी दिसेल अशी कोणतीही गैरवर्तणूक अगर कामाची हयगई केल्याबदल तो दोषी असल्यास, हुद्यावरून दूर करण्यास मुखत्यार आहे: मात्र त्याबदलचीं कारणें त्यानें लिहून ठेविलीं पाहिजेत.

रिकाम्या झालेल्या जागा भरणें.

३३. (१) जेव्हां कोणत्याही कारणावरून आरोग्यरक्षक कमिटीचा कोणताही मेंबर किंवा चेअरमन याची अगर आरोग्यरक्षक बोर्डाचा कोणताही मेंबर किंवा अध्यक्ष याची जागा रिकामी होईल अगर व्हावयाची असेल, तेव्हां कलेक्टरानें विलंब न लावितां अशी रिकामी जागा भरण्याकरितां कोणातरी मनुष्याची नेमणूक केली पाहिजे.

(२) अशी कोणतीही जागा रिकामी राहील तोंपर्यंत ती रिकामी झालेली नाहीं असें समजून आरोग्यरक्षक कमिटीच्या किंवा बोर्डाच्या राहिलेल्या मेंबरांनीं काम पाहिलें पाहिजे.

३४. निकालासाठीं आरोग्यरक्षक कमिटी किंवा बोर्ड यापुढें येणाऱ्या प्रत्येक बाबतीचा निकाल, सदरहू कमिटीच्या किंवा बोर्डाच्या फर्माविलेल्या सभेंत, अगर कलेक्टराच्या हुकुमानें किंवा इतर रीतीनें, सर्व मेंबरांत योग्य रीतीनें नोटीस दिल्यानंतर भरलेल्या सभेंत हजर असून मतें देणाऱ्या मेंबरांच्या बहुमतानें केला पाहिजे : समसमान मतें पडतील तेव्हां अध्यक्षस्थानीं असणाऱ्या मेंबरास एक जास्त किंवा निर्णायक मत देण्याचा अधिकार आहे. बहुमतानें निकाल करण्याच्या बाबती.

३५. आरोग्यरक्षक कमिटी किंवा बोर्ड यांनीं अगर यांच्या हुकुमानें काढलेलीं समन्सें, नोटिसा व हुकुम यांवर, कमिटीच्या किंवा बोर्डाच्या वतीनें सही करण्याचा अधिकार, सदरहू कमिटीच्या किंवा बोर्डाच्या कोणत्याही सभेंत अध्यक्षस्थानीं असणाऱ्या मेंबरास आहे. समन्सें वगैरे यांवर सही करणें.

३६. ११ व्या कलमाच्या रकमा (अ) व (ब) यांत निर्दिष्ट केलेल्या गोष्टी खेरीज करून इतर कोणत्याही गोष्टीच्या संबंधानें या आक्टाअन्वयें आरोग्यरक्षक कमिटीनें किंवा बोर्डानें केलेल्या कोणत्याही कानूचें उल्लंघन केल्याबद्दल, सदरहूप्रमाणें केलेल्या कानूवरून शिक्षेचे परमावधीचें मान कोणत्याही बाबतींत कमी ठरविलें असेल ती बाबत शिवाय करून, दहा रुपयांपर्यंत दंडाची, आणि दंड न दिल्यास, पराकाष्ठा अठ्ठेचाळीस तासांच्या मुदतीपर्यंत चावडींत अटकावून ठेवण्याची शिक्षा होईल; आणि उल्लंघन चालू राहिल्यास, पहिल्या उल्लंघनाबद्दल शाबितीचा ठराव झाल्यानंतर किंवा उल्लंघन करण्याचें बंद करण्याविषयीं कमिटी किंवा बोर्ड यांकडून अगर आरोग्यरक्षक इन्स्पेक्टराकडून नोटीस मिळाल्यानंतर ज्या ज्या दिवशीं सदरहू उल्लंघन चालू राहील त्या प्रत्येक दिवसाबद्दल दोन रुपयांपर्यंत दंडाची, आणि दंड न दिल्यास, वर सांगितल्याप्रमाणें अटकेंत ठेवण्याची शिक्षा होईल. या आक्टाअन्वयें केलेल्या कानूंच्या उल्लंघनाबद्दल शिक्षा.

३७. (१) कोणतीही आरोग्यरक्षक कमिटी किंवा बोर्ड, दंडाची शिक्षा झालेल्या कोणत्याही मनुष्यास, तारणाच्या संबंधानें त्या कमिटीस किंवा बोर्डास जरूर वाटेल तशा शर्ती ठरवून, दंडाची रकम भरण्यासाठीं पराकाष्ठा चार दिवसांपर्यंत आपणास योग्य वाटेल ती कोणतीही मुदत देण्यास मुखत्यार आहे. दंड वसूल करण्याबद्दल हुकुम.

(२) दंडाची रकम देण्यांत न येईल तेव्हां, शिक्षेचा ठराव करणारी अगर जिच्या निकालावर अपील होऊन शिक्षेचा ठराव झाला ती आरोग्यरक्षक कमिटी किंवा बोर्ड, आपल्या नजरेस येईल त्याप्रमाणें, दंड देण्यांत न आला तर अपराध करणारास अटकेंत ठेवावें असें शिक्षेच्या ठरावांत फर्माविलें असलें, आणि तसेंच अपराध करणारा अटकेंत असला किंवा त्यानें अटकेची शिक्षा भोगिली असली तथापि, लेखी हुकुम देऊन दंडाची रकम वसूल करण्याविषयीं फर्माविण्यास मुखत्यार आहे.

३८. जे दंड वसूल करण्यासाठीं वर सांगितल्याप्रमाणें हुकुम दिला असेल ते सर्व दंड, आणि या आक्टाअन्वयें बसविलेल्या कोणत्याही पट्टीबद्दल आकारलेल्या ज्या रकमा वाजवी नोटीस दिल्यानंतर भरण्यांत आल्या नसतील त्या सर्व रकमा, हुकुमनामे बजाविण्याच्या कामीं जंगम मत्ता विकावयाची त्यासंबंधानें दिवाणी काम चालविण्याच्या रीतीचा कायदा यांत जे अपवाद सांगितले आहेत त्यांस अनुसरून, सदरील दंड अगर रकमा देण्यास पात्र असलेल्या मनुष्याची कोणतीही जंगम मत्ता जप्त करून व विकून, पाटिलानें किंवा या बाबतींत कलेक्टर किंवा कलेक्टराच्या मंजुरीनें आरोग्यरक्षक कमिटी अगर बोर्ड नेमील त्या दुसऱ्या मनुष्यानें वसूल केल्या पाहिजेत. दंड व पट्टा वसूल करणें.

३९. या आक्टाअन्वयें केलेल्या कानूंचें उल्लंघन केल्याबद्दल वसूल केलेले सर्व दंड, अपराध करणारांवर फौजदारी काम चालविण्याच्या कामीं कांहीं खर्च झाला अस- दंडांचें नक्की उत्पन्न, अपराध जेथें झाले असतील त्या गांवांवर

अधिकार असणाऱ्या कमिटीच्या अगर बोर्डाच्या हिशोबीं जमा करणें.

ल्यास तो त्यांतून वजा करून, मामलतदाराकडे किंवा कलम १७ किंवा ३० याअन्वयें कलेक्टरानें नेमलेल्या इतर अमलदाराकडे भरले पाहिजेत; आणि ते त्यानें, कानूंचें उल्लंघन ज्या गांवांत झालें असेल त्या गांवांवर अधिकार असणाऱ्या आरोग्यरक्षक कमिटीच्या किंवा बोर्डाच्या हिशोबीं, या आक्टांत योजिलेल्या कोणत्याही कामीं खर्च करण्यासाठीं, जमा केले पाहिजेत.

लोकल बोर्डाकडून वर्गण्या व कर्जें.

४०. (१) कोणताही जिल्हा किंवा तालुका लोकल बोर्ड, आपल्या अखत्यारांत असलेल्या लोकल फंडाच्या भागापैकीं आपणास योग्य वाटेल ती रकम या आक्टांत योजिलेल्या कोणत्याही कामीं खर्च करण्यासाठीं, आपल्या अधिकाराखालच्या प्रदेशांतील कोणत्याही गांवच्या किंवा गांवांच्या समुदायाच्या आरोग्यरक्षक कमिटीकडे अगर बोर्डाकडे देणगीच्या किंवा कर्जाच्या रूपानें वेळोवेळीं नेमून देण्यास मुखत्यार आहे.

(२) याप्रमाणें कोणतीही नेमून दिलेली रकम मामलतदाराकडे किंवा १७ व्या अगर ३० व्या कलमाअन्वयें कलेक्टरानें नेमिलेल्या इतर अमलदाराकडे भरली पाहिजे, आणि ज्या आरोग्यरक्षक कमिटीकडे किंवा बोर्डाकडे ती नेमून दिली असेल त्या कमिटीच्या किंवा बोर्डाच्या हिशोबीं त्याणें ती जमा केली पाहिजे.

(३) परंतु कलेक्टराच्या मंजुरीवांचून कोणतीही रकम कर्जाच्या रूपानें सदरहूप्रमाणें नेमून देतां कामा नये; आणि अशा मंजुरीनें कर्जाच्या रूपानें नेमून दिलेली प्रत्येक रकम, कलेक्टरानें आरोग्यरक्षक कमिटी किंवा बोर्ड यांचा विचार घेऊन अशा कमिटीच्या किंवा बोर्डाच्या अधिकारांतील प्रदेशांतल्या रहिवाशांवर पट्टी आकारून व बसवून सदरहू पक्षकारांच्या दरम्यान व्याजाचे व मुदलाचे हप्ते ठरले असतील त्या हप्त्यांनीं वसूल केली पाहिजे.

दोन किंवा अधिक आरोग्यरक्षक कमिट्या किंवा बोर्ड यांच्या सामायिक हितसंबंधाचीं कामें करण्याबाबद.

४१. (१) निरनिराळ्या आरोग्यरक्षक कमिट्या किंवा बोर्ड यांच्या अधिकारांतील दोन किंवा अधिक गांवांस पाण्याचा पुरवठा करण्याचीं किंवा त्यांतील वापराचें वगैरे पाणी काढून बाहेर नेण्याचीं कामें, आणि अशा दोन किंवा अधिक गांवांच्या सामायिक आरोग्यास किंवा सुखास हितावह असें इतर कोणतेंही काम किंवा तजवीज हीं, अशा सर्व कमिट्या व बोर्ड यांनीं किंवा त्यांपैकीं बहुमताचे पक्षानें कलेक्टराची मंजुरी घेऊन विनंति केल्यास, कलेक्टरास, किंवा त्याच्या अगर सरकार नेमील अशा इतर अमलदाराच्या हुकुमाखालीं, करण्याचा अखत्यार आहे.

सदरील कामांचा खर्च वसूल करणें.

(२) असें कोणतेंही काम किंवा तजवीज करण्यास लागलेला खर्च सदरहू निरनिराळ्या कमिट्यांनीं व बोर्डांनीं आपसांत ठरविलेल्या प्रमाणानें किंवा तशा प्रकारचा ठराव झाला नसल्यास, कलेक्टर ठरवील त्या प्रमाणानें वांटून त्यांजवर घातला जाईल; आणि तो, सदरहू प्रमाणानें कलेक्टराकडून, प्रत्येक कमिटीचा व बोर्डाचा विचार घेऊन, सदरहू कमिट्यांच्या व बोर्डांच्या अधिकारांतल्या प्रदेशांतील रहिवाशांवर पट्टी आकारण्यांत व बसविण्यांत येऊन, वसूल केला जाईल: या पट्टीस, कलम १८, रकम (१) अन्वयें बसविलेल्या पट्ट्यांच्या संबंधानें त्या कलमाच्या २ ऱ्या रकमेवरून जी इयत्ता ठरविली आहे तीच लागू राहील असें समजावें.

आरोग्यरक्षक कमिटीनें अगर बोर्डानें योजलेलें काम लोकल बोर्डानें योजलेल्या कामास बाधक होत असल्यास, यापैकीं पहिलें बंद करणें.

(३) जेव्हां या आक्टाअन्वयें स्थापन केलेल्या कमिटीनें किंवा बोर्डानें हातीं घेतलेलें किंवा योजिलेलें कोणतेंही काम अशा प्रकारचें असेल कीं तेणेंकरून जिल्हा किंवा तालुका लोकल बोर्डानें हातीं घेतलेल्या किंवा योजलेल्या कोणत्याही कामास अडचण येईल किंवा तें दुसऱ्याच रीतीनें बाधक होईल, तेव्हां असा लोकल बोर्ड त्या आरोग्यरक्षक कमिटीस किंवा बोर्डास वर सांगितल्या प्रकारचें काम बंद पाडण्याविषयीं फर्माविण्यास मुखत्यार आहे; आणि मग सदरहूप्रमाणें फर्माविल्यावरून बंद पाडलेल्या

कामाच्या योगानें, आरोग्य, स्वच्छता व मर्यादा यांचीं जशीं साधनें प्राप्त झालीं असतीं तशींच किंवा त्यांसारखीं साधनें सदरहू आरोग्यरक्षक कमिटीच्या किंवा बोर्डाच्या अधिकाराखालील प्रदेशास प्राप्त करून देण्याची वाजवी मुदतीच्या आंत वाजवी तजवीज करणें हें सदरहू जिल्हा किंवा तालुका लोकल बोर्डाचें काम आहे असें समजावें.

सदरील प्रसंगीं माहिती मागविण्याचा लोकल बोर्डास अधिकार आहे.

(४) सदरील ३ऱ्या रकमेंतील ठराव लागू असतील असें जें कोणतेंही काम करावयाचें योजिलें असेल किंवा करण्याचें चालू असेल त्याच्या संबंधानें माहिती मिळविण्याच्या कारणासाठीं, आरोग्यरक्षक कमिटीकडून किंवा बोर्डाकडून कलेक्टरामार्फत जरूर व वाजवी असेल तो रिपोर्ट मागविण्यास व या बाबतींत तालुका किंवा जिल्हा लोकल बोर्डास जरूर वाटेल तशा प्रकारें पाहणी व रिपोर्ट आपल्या नोकरींतील कोणत्याही मनुष्याकडून करविण्यास तो तालुका किंवा जिल्हा लोकल बोर्ड मुखत्यार असेल, आणि सदरहू मागणीप्रमाणें रिपोर्ट देणें व कोणतीही पाहणी करण्याविषयीं वर सांगितल्याप्रमाणें फर्माविलें असेल ती करण्याच्या कामांत वाजवी मदत व सवड देणें हें संबंध असलेल्या आरोग्यरक्षक कमिटीचें किंवा बोर्डाचें काम आहे असें समजावें.

कांहीं गांव-नोकरांस आरोग्यरक्षक कमिटीच्या किंवा बोर्डाच्या ताब्यांत देणें.

४२. स्वच्छता ठेवणें अगर लोकांच्या आरोग्य रक्षणाची तजवीज ठेवणें याच्या किंवा त्यांसंबंधी नोकरीबद्दल, सर्वांशीं किंवा अंशतः, वेतनाच्या रूपानें जमीन, जमिनीचें उत्पन्न किंवा इतर प्राप्ति भोगत असणाऱ्या गांव नोकरांस, अशा नोकरीच्या संबंधानें, कलेक्टराला, सरकारच्या निर्बंध लागू राहून, सदरहू नोकरी घ्यावयाच्या जागेंत अधिकार असणारी आरोग्यरक्षक कमिटी किंवा बोर्ड यांच्या ताब्यांत व देखरेखीखालीं देण्याचा अखत्यार आहे; आणि अशा नोकरांस सदरहू कमिटीचे किंवा बोर्डाचे सर्व वाजवी हुकुम बजाविणें भाग आहे व ते नोकर त्यांत कसूर झाल्यास या आक्टाअन्वयें केलेल्या कोणत्याही कानूंन ठरविल्या जातील त्या वाजवी शिक्षा भोगण्यास पात्र होतील असें समजावें.

आरोग्यरक्षक कमिटी। किंवा बोर्ड यांच्या ताब्यांत दिलेल्या गांव-नोकरांस द्यावयाचा ऐवज ठरविणें व तो वसूल करणें.

४३. (१) कलेक्टरानें:—

(अ) सदरील शेवटच्या कलमाअन्वयें आरोग्यरक्षक कमिटी किंवा बोर्ड यांच्या ताब्यांत दिलेल्या गांव-नोकरांस, रिवाजाप्रमाणें किंवा वंशपरंपरेचे हुद्याविषयींचा मुंबईचा आक्ट यान्या १८व्या, १९ व्या किंवा २० व्या कलमांत सांगितलेल्या कोणत्याही ठरावाअन्वयें, कोणत्याही वेळीं येणें होणारा ऐवज किती द्यावयाचा अशाविषयीं उपस्थित होणाऱ्या सर्व तकरारींच्या बाबतींत तो ऐवज ठरविला पाहिजे; आणि

(ब) जरूर असल्यास, तो ठरवील तेवढा ऐवज, किंवा तो ऐनजिनसी असल्यास त्याची विवक्षित काळीं असलेल्या बाजारभावानें नक्त किंमत, ज्यास तो मिळण्याचा हक्क असेल त्या गांव-नोकराच्या वतीनें, जमीन-महसुलाच्या बाकीप्रमाणें कांहीं खर्च न घेतां, वसूल करविली पाहिजे:—

(२) मात्र इतकेंच कीं सदरहू ऐवजाच्या कामाबद्दल देणें असेल तें काम कोणत्याही नोकरानें योग्य रीतीनें बजाविलेलें नाहीं असें कलेक्टरास वाटल्यास कलेक्टर त्या नोकराच्या वतीनें सदरहूप्रमाणें वसूल करविण्यास इनकार करण्यास मुखत्यार आहे.

या आक्टाखालील कलेक्टराचीं कामें सोंपून देतां येतील.

४४. या आक्टावरून कलेक्टरास दिलेला कोणताही अधिकार किंवा त्याकडे सोंपलेलें कोणतेंही काम सरकारच्या मंजुरीनें, असिस्टंट किंवा डेप्युटी कलेक्टर याला देण्याचा किंवा त्याकडे सोंपण्याचा कलेक्टरास अधिकार आहे.

कलेक्टर, माजिस्ट्रेट व इतर सरकारी नोकर हे आपला अधिकार चालविण्याच्या संबंधानें नेहमीच्या निर्बंधास पात्र असतील.

४५. कलेक्टर, माजिस्ट्रेट व इतर सरकारी नोकर यांना या आक्टावरून दिलेलीं कामें करतांना व दिलेला अधिकार चालवितांना ते, आपलीं नेहमीचीं कामें करण्याच्या संबंधानें ज्या निर्बंधास पात्र असतात त्याच निर्बंधास पात्र असतील असें समजावें.

या आक्टाअन्वयें इमानेंइतबारें काम करणाऱ्या मनुष्यास शिक्षेची माफी.

४६. (१) कोणताही माजिस्ट्रेट, कलेक्टर, आरोग्यरक्षक कमिटी किंवा बोर्ड यांचा अध्यक्ष अगर मेंबर, किंवा आरोग्यरक्षक इन्स्पेक्टर, या आक्टावरून त्यास दिलेला अधिकार किंवा त्याकडे सोंपलेलें काम बजावण्यांत अगर बजाविण्याचा इरादा असतां, इमानेंइतबारें त्यानें केलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल कोणतीही शिक्षा होण्यास किंवा नुकसान भरून देण्यास जबाबदार होणार नाहीं.

(२) तसेंच, कोणताही सरकारी नोकर किंवा योग्य रीतीनें अधिकार मिळालेला किंवा नेमलेला मनुष्य हाही, या आक्टावरून किंवा या आक्टाअन्वयें केलेल्या कोणत्याही कानूवरून अधिकार असलेल्या मनुष्यानें अधिकारपरत्वें काढलेला आहे असा दिसणारा कोणताही हुकूम किंवा ताकीद इमानेंइतबारें अमलांत आणण्याबद्दल वर सांगितल्याप्रमाणें जबाबदार होणार नाहीं.

## परिशिष्ट.

(कलम ३ पहा.)

| कायद्याचा नंबर व वर्ष. | विषय किंवा सरनामा. | किती रद्द केला तें. |
|---|---|---|
| सन १८६७चा मुंबईचा आक्ट ७. | सन १८६७ चा मुंबईचा डिस्ट्रिक्ट पोलीस आक्ट. | कलमें ३३ व ३४. |
| सन १८६७चा मुंबईचा आक्ट ८. | सन १८६७ चा मुंबईचा गांवचा पोलीस आक्ट. | १६ व्या कलमांतील रकमा २ व ३ व रकम ४ यांतील " कोणतेंही सार्वजनिक रस्त्यांत किंवा मार्गांत किंवा रहदारीचे ठिकाणांत मलमूत्र करून घाण करील किंवा" हे शब्द, आणि रकम ५. |

(True Translation.)

Y. M. KELKAR,

Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.